# महापरिनिर्वाण दिवस

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६५ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दीक्षाभूमी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती,डॉ.आंबेडकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग ,समता सैनिक दल रा.तू.म.नागपूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग व नागपुरातील विविध संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ६ डिसेंबर २०२१ ला महारक्त दान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या४२ विध्यार्थ्यांनी रक्तदान करून महामानवाला अनोखे अभिवादन केले.या प्रसंगी स्मारक समितीचे अध्यक्ष भदन्त आर्य नागार्जुन सुरेई ससाई ,सचिव डॉ.सुधीर फुलझेले ,सदस्य विलास गजघाटे ,डॉ.चंद्रशेखर मेश्राम,प्राचार्या डॉ.बी ए मेहेरे .रा.से.यो चे कार्यक्रम अधिकारी . डॉ.रवींद्र तिरपुडे,नागपूर विद्यापीठाच्या रा.से.यो. विभागाचे संचालक डॉ.सोपानदेव पिसे उपस्थित होते.














महाराष्ट्र टाइम्स नागपूर । शुक्रवार, १० डिसेंबर २०२१




## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'महारक्तदाना'ने अभिवादन

**नागपूर :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६५व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दीक्षाभूमी येथे महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी रक्तदान करून महामानवाला अनोखे अभिवादन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, डॉ. आंबेडकर महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, डॉ. आंबेडकर इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲण्ड रिसर्च, राष्ट्रीय छात्र सेना, व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, समता सैनिक दल तसेच विविध संस्थांच्या संयुक्त विद्यमाने या महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी स्मारक समितीचे अध्यक्ष भदन्त आर्य नागार्जुन सुरेई ससाई, सचिव डॉ. सुधीर फुलझेले, सदस्य विलास गजघाटे, डॉ. चंद्रशेखर मेश्राम, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. भुवनेश्वरी मेहेरे, उपप्राचार्य डॉ. ए. पी. जोशी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रासेयो विभागाचे संचालक डॉ. सोपान पिसे, महाविद्यालयाचे रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, सुजीत चव्हाण, समता सैनिक दलाचे पदाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते.